**अहिल्यानगर महानगरपालिका अहिल्यानगर**
नगरसचिव विभाग
प्रशासकीय इमारत, छत्रपती संभाजीनगर रोड,अहिल्यानगर

मा. प्रशासक यांजकडील मा.महासभा क्रमांक -४४ विषयाबाबतचे निर्णय

मा.प्रशासक ठराव क्रमांक -१५४ दिनांक – २१/०४/२०२५

विभाग – प्रसिध्दी विभाग

---

**प्रस्तावाचा विषय** – दै.पुण्यनगरी , दै.पुढारी, दै.महाराष्ट्र टाईम्स ,दै.नव भारत , दै.सार्वमत दै.नवराष्ट्र , दै.तरूण भारत , दै. नवभारत टाईम्स ,दै. सामना ,दै. नगरी दवंडी , दै. लोकमंथन , दै. नगर सह्याद्री ,दै. समाचार , दै. नवामराठा , दै.लोकमत, दै.महाराष्ट्र निरोप्या , दै.नगरटाईम्स, सा. जनसत्ता ,सा.मगदुम '(उर्दु ), सा.संत नगर टाईम्स ,सा.लोक अंकुर ,सा.ज्ञानधारा ,सा. नगरवेध ,सा. पोलीस पेपर, सा. सिटी वॉच यांचे सन २०२२-२३ ,२०२३-२४ या कालावधीतील देयकांस मा. महासभेची मंजुरी मिळणे बाबत.

--**--

**ठराव** – विभागाने सादर केलेल्या प्रस्तावानुसार, अहिल्यानगर महानगरपालिकेच्या विविध विभागाच्या जाहिराती प्रसिध्दी विभागामार्फत शासनमान्य यादीवरील वृत्तपत्रंमध्ये रोटेशन नुसार प्रसिध्दी करण्यात येतात. दै.पुण्यनगरी , दै.पुढारी, दै.महाराष्ट्र टाईम्स ,दै.नव भारत , दै.सार्वमत दै.नवराष्ट्र , दै.तरूण भारत , दै. नवभारत टाईम्स ,दै. सामना ,दै. नगरी दवंडी , दै. लोकमंथन , दै. नगर सह्याद्री ,दै. समाचार , दै. नवामराठा , दै.लोकमत, दै.महाराष्ट्र निरोप्या , दै.नगरटाईम्स, सा. जनसत्ता ,सा.मगदुम '(उर्दु ), सा.संत नगर टाईम्स ,सा.लोक अंकुर ,सा.ज्ञानधारा ,सा. नगरवेध ,सा. पोलीस पेपर, सा. सिटी वॉच यांचे सन २०२२-२३ ,२०२३-२४ या कालावधीतील एकुण ५०४ जाहिरातीची बिले प्राप्त झाले आहेत. सदरची सन २०२२-२३ ,२०२३-२४ या वर्षातुन खर्ची टाकणेकरीता महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता २०११ मधील नियम १६८ प्रमाणे मुदतबाह्य मागण्या मा.महासभेची मंजुरी शिवाय देता येणार नसल्याने विभागाने सादर केलेल्या प्रस्तावास मा.प्रशासक सर्वसाधारण सभा मंजुरी देत आहे.

---

**निर्णय** - महाराष्ट्र शासन.नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक एमसीओ -२०२३/प्र.क्र. ४३१ / नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत ) मुंबई -३२ दि. २८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा. महासभेच्या अधिकाराचा वापर करून उपरोक्त ठरावास मा. प्रशासक यांनी मंजुरी दिली.

सही/-
(मेहेर लहारे)
प्र. नगरसचिव
अहिल्यानगर महानगरपालिका

सही/-
(यशवंत डांगे)
प्रशासक
अहिल्यानगर महानगरपालिका

# अहिल्यानगर महानगरपालिका अहिल्यानगर

नगरसचिव विभाग

प्रशासकीय इमारत, छत्रपती संभाजीनगर रोड,अहिल्यानगर

मा. प्रशासक यांजकडील मा.महासभा क्रमांक -४४ विषयाबाबतचे निर्णय

**मा.प्रशासक ठराव क्रमांक -१५५**

**दिनांक** – २१/०४/२०२५

**विभाग** – सार्व. बांधकाम विभाग

---

**प्रस्तावाचा विषय** – फेर ई नि. क्र. ९५१२४०-०१ अहिल्यानगर मनपा हद्दीतील प्र. क्र. ४ मधील समतानगर येथील सुर्यवंशी घर ते डेमला घर ,बालाजी कॉलनी पर्यत रस्ता डांबरीकरण करणे हे काम रद्द करणेस व मा. शासन हिस्सा रू ६,९९,४७६/- शासन खाती जमा करणेकामी मा. प्रशासक महासभेची मंजुरी मिळणे बाबत.

--**--

**ठराव** – विभागाने सादर केलेल्या प्रस्तावानुसार,अहिल्यानगर मनपा हद्दीतील प्र.क्र. ४ मधील समता नगर येथील सुर्यवंशी घर ते दोलतानी घर ते डेमला घर ,बालाजी कॉलनी पर्यत रस्ता डांबरीकरण करणे या कामास मा.जिल्हाधिकारी यांचेकडील प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे.

सदर प्रशासकीय मान्यतेनसार सदर कामाची ई निविदा क्र ९०६१९७ दि. २२/५२०२४ रोजी प्रसिध्द करणेत आलेली होती.परंतु उक्त कामास कोणत्याही ठेकेदार संस्थेचा प्रतिसाद न मिळाल्याने सदर कामाची फेर ई निविदा क्र ९५१२४० दि.२५/९२०२३ ते २१०/२०२३ अखेर मागविण्यात आलेली होती.त्यामध्ये श्री चेतन मारूती जाव व श्री अंबादास रामदास चौधरी यांची निविदा दाखल केलेल्या होत्या सदर निविदेची तांत्रीक छाननी केली असता दोन्ही निविदा धारकांची कागदपत्रे अपुर्ण असलेने इकडील सा. बांध. वि. जा.क्र. २८२४ व २८२५ दि.२०/१०/२०२३ रोजी पत्र् देवून कागदपत्रे सादर केली होती. परंतु ती कागदपत्रे अपुर्ण असलेने त्यांना वेळोवेळी कागदपत्रंची पुर्तत करणेबाबत सांगितले परंतु कागदपत्रंची पुर्तता केली नसल्याने दि.२०/२/२०२४ रोजी दुस-यांदा फेर निविदा मागविणे संदर्भात रिपोर्ट ठेवून त्यास मंजुरी घेण्यात आलेली होती. परंतु सदरचे काम हे महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महा अभियान (जिल्हास्तर ) सन २०२२-२३ या अंतर्गत असलेने त्याची मुदत ही संपलेली होती. शासनाची अखिर्चीत असलेला निधी खर्च करणेस मुदतवाढ आल्यानंतरच निविदा प्रसिध्द करता येणार असलेने सदर कामांची दुस-यांदा फेर निविदा प्रसिध्द करण्यात आलेली नाही. सदस्थितीत सदर कामास दि. ६/२/२०२५ मुदातवाढ आलेली आहे.

तथापी सदर ठिकाणी डांबरीकरणा ऐवजी रस्ता कॉक्रीटीकरणाचे काम व्हावे अशी स्थानिक नागरीक व त्यावेळेचे प्रभागातील नगरसेवक यांची मागणी असलेने महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महा अभियान (जिल्हास्तर ) सन २०२३-२४ अंतर्गत सदर ठिकाणचा व परिसदरतील रस्ते कॉक्रीटीकरण करणेचा प्रस्ताव सादर केला होता. त्यास मंजूरी मिळाल्यानुसार सदि्स्थतीत सदर ठिकाणी रस्ता कॉक्रटीकरणाचे काम झालेले आहे.

तरी उक्त ठिकाणी सद्यस्थितीत काम झालेले असलेने महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर ) सन २०२२-२३ या अंतर्गत प्र.क्र . ४ मधील समतानगर येथील सुर्यवंशी घर ते दोलनानी घर ते डेमला घर .बालाजी कॉलनी पर्यत रस्ता डांबरीकरण करणे हे काम रद्द करणेस तसेच सदर कामाची शासन हिस्सा रक्कम रू. ६,९९,४७६/- ही शासन खाती जमा करणेबाबतच्या प्रस्तावास मा.प्रशासक सर्वसाधारण सभा मंजुरी देत आहे.

---

**निर्णय** - महाराष्ट्र शासन.नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक एमसीओ -२०२३/प्र.क्र. ४३१ / नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत ) मुंबई -३२ दि. २८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा. महासभेच्या अधिकाराचा वापर करून उपरोक्त ठरावास मा. प्रशासक यांनी मंजुरी दिली.

सही/-
(मेहेर लहारे)
प्र. नगरसचिव
अहिल्यानगर महानगरपालिका

सही/-
(यशवंत डांगे)
प्रशासक
अहिल्यानगर महानगरपालिका